अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । शुक्रवार
०९.१०.२०२६
वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २५० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## राज्यात आणखी ३६ तालुके दुष्काळाच्या यादीमध्ये समाविष्ट होणार

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती

### ग्राउंड ट्रूथिंगबद्दलही मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - मागच्या कॅबिनेट सबकमिटीमध्ये १८ तालुक्याबद्दलच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्यावर २० टक्के ग्राउंड ट्रूथिंग सर्वेक्षण करावं आणि दुष्काळाच्या यादीमध्ये यांचाही समावेश घेऊ ग्राउंड ट्रूथिंग करता येऊ शकतो, असा शासन निर्णय मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने आज आपण काढलेला आहे.



सोबतच १८ तालुक्यांची पुन्हा एक यादी आली आहे, त्यावर अहवाल मागितलेला आहे. अहवाल आल्यानंतर त्याचाही ग्राउंड ट्रूथिंग करू आणि त्यावर निर्णय घेऊ. असे महत्वाचं विधान राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. सोबतच ३६ तालुके या ठिकाणी पुन्हा सर्वेक्षणासाठी आम्ही पाठवले आहेत.

२६५ पैकी आणखी ३६ तालुके हे कॅबिनेट सबकमिटीमध्ये आले आहेत, माझ्याही प्रवासात याबद्दलचे निवेदन आले होते. लोकप्रतिनिधी बांधावर गेले होते या सर्वांनी शिफारशी केल्या होत्या. या संदर्भात आता मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या, असेही ते म्हणाले.

**पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषीमंत्री यांच्या प्रयत्नांनी मोठा सपोर्ट महाराष्ट्राला मिळेल**

केंद्र सरकारचे दुष्काळ पथक महाराष्ट्रातील परिस्थितीची पाहणी करत आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील दुष्काळाची दखल घेतली आहे असून तातडीने पथक पाठवले आहे. या तीनही टीम महाराष्ट्राचे सर्वेक्षण करतील. मला विश्वास आहे की पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषीमंत्री यांच्या प्रयत्नांनी एक मोठा सपोर्ट महाराष्ट्राला मिळेल, असेही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. विधान परिषद निवडणूकीतील बंडखोरी बाबत बोलायचं झालं तर, आमचा प्रयत्न आहे की भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता हा निवडणुकीत बंडखोरी करू नये, असा आमचा प्रयत्न आहे. त्या उपरही बंडखोरी झाली तर त्यांच्याबद्दल काय चर्चा करायची, काय निर्णय घ्यायचा, याबद्दलच्या सर्व अधिकार प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आहेत, ते घेतील असेही ते म्हणाले.

**पक्ष आपल्या आईसारखा असतो, पक्षाविरुद्ध भूमिका अनिल सोले घेणार नाही**

नागपुरात अनिल सोले बंडखोरीच्या भूमिकेत आहे. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मागच्यावेळी आमची चर्चा झाली होती, बैठकी झाली होती. आम्हाला वाटलं होतं की ते फॉर्म भरणार नाही. मात्र त्यांनी फॉर्म भरला, आमची त्यांना विनंती आहे की अनिल सोले यांनी या निवडणुकीत अधिकृत उमेदवाराच्या विरुद्ध लढू नये, सुधाकर कोहळे यांना पक्षाने उमेदवारी दिलेली आहे.

मलाही एकदा थांबवण्यात आले होते, नंतर मला पुन्हा तिकीट दिलं, पक्ष आपल्या आईसारखा असतो, त्यामुळे मला असं वाटतं की पक्षाविरुद्ध भूमिका अनिल सोले घेणार नाही. तीन वाजेपर्यंत ते विड्रॉ करतील, अशी मला अपेक्षा आहे, असेही महसूलमंत्री म्हणाले.

## सुनेत्रा पवारांविरोधात भूमिका घेणाऱ्या सदस्यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटापासून वेगळी भूमिका घेत स्वतंत्र पॅनेल उभारणारे कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांच्यासह त्यांच्या पॅनेलमधील सदस्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बंडखोरांना नाव न घेता इशारा दिल्यानंतर ही कारवाई जाहीर करण्यात आली. त्यामुळे सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीतील राजकीय संघर्षाला नवे वळण मिळाले आहे. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत तीन पॅनेल आमनेसामने आले आहेत. अजित पवार गटाचे 'श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनेल', 'लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनेल' आणि



'सोमेश्वर शेतकरी विकास पॅनेल' यांच्यात लढत होत आहे. विद्यमान अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप हे अजित पवार यांचे विश्वासू मानले जात होते. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांनी स्वतंत्र पॅनेल उभे केले. या पॅनेलला भाजपचा पाठिंबा असल्याचे समजते.

जगताप यांच्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी दोन दिवसांपूर्वी नाव न घेता बंडखोरांना इशारा दिला होता. 'कुठल्याही चुकीच्या अफवेला बळी पडू नका. एकदा बाहेर ते कायमचे बाहेर, एवढे लक्षात ठेवा. दादा खूप मोठ्या मनाचे होते; दादांसारखी मी नाही,' असे त्या म्हणाल्या होत्या. त्यानंतर आता पक्षाने हकालपट्टीची कारवाई जाहीर केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर, संभाजी होळकर आणि बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव यांच्या उपस्थितीत शुक्रवारी पत्रकार परिषद झाली. या वेळी तालुकाध्यक्ष संदीप बांदल यांनी पक्षाच्या भूमिकेपासून दूर जात स्वतंत्र पॅनेल उभारल्याच्या कारणावरून पुरुषोत्तम जगताप यांच्यासह त्यांच्या पॅनेलमधील सदस्यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचे जाहीर केले.

## आयोग बदला, निवडणूक वाचवा! ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा

### सुप्रिया सुळे यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** - निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरून इंडिया आघाडीने केंद्र सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.




मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी इंडिया आघाडीचे खासदार दिल्लीत आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाला अधिक बळ देण्यासाठी राज्यनिहाय आंदोलनाची रणनीती आखण्यात आली असून, हा मुद्दा पूर्ण ताकदीने लावून धरला आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी ठाण्यात सांगितले.

कल्याण येथील एका खासगी कार्यक्रमासाठी जात असताना मुलुंड चेकनाका येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सुळे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड, शहराध्यक्ष मनोज प्रधान यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सुळे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर टीका केली. निवडणुकीतील गैरप्रकार हा आता केवळ राजकीय मुद्दा राहिलेला नाही. सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणात महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. संबंधितांना माहिती न देता निवडणूक आयोगाने एकतर्फी निर्णय घेतला. हा प्रकार नियम आणि कायद्याच्या चौकटीत बसणारा नाही, असा आरोप सुळे यांनी केला.

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी लवकरच दिलासादायक निर्णय?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षार्थींच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून, येत्या काही दिवसांत विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यांसंदर्भात चांगली बातमी मिळण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी दिली. मुख्यमंत्र्यांची भूमिका सकारात्मक असल्याचे जाणवल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना संयम राखण्याचे आवाहन केले.पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे




आंदोलन सुरू असून, शुक्रवारी या आंदोलनाचा नववा दिवस आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी राज ठाकरे यांनी ५ ऑक्टोबर रोजी आंदोलनस्थळी भेट दिली होती. त्या वेळी विद्यार्थ्यांच्या रास्त अपेक्षांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यानुसार फडणवीस यांच्याशी चर्चा झाल्यानंतर राज ठाकरे यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टद्वारे याबाबतची माहिती दिली.

नोकरीच्या शोधात स्वतःचा जिल्हा, तालुका, घर आणि कुटुंबापासून दूर राहून मेहनत करणाऱ्या तरुण-तरुणींना पाहून मनाला वेदना होतात, असे राज ठाकरे यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली असून, ते सकारात्मक असल्याचे जाणवल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काही दिवसांत एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यांसंदर्भात दिलासादायक निर्णय होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नसल्याने आंदोलन सुरूच आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

## नाना पाटेकरांच्या 'नाम फाऊंडेशन'मुळे धोंदलगाव टँकरमक्त : गावकऱ्यांकडून आठवणींना उजाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**धोंदलगाव** - मराठवाड्यातील 'धोंदलगाव' नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांच्या 'नाम फाऊंडेशन'ने दत्तक घेतले होते. या गावात जलसंधारणसाठी निधी देऊन ते गाव दुष्काळमुक्त बनवण्यात आले. 'नाम फाऊंडेशन'ने २०१६ मध्ये वैजापूर तालुक्यातील 'धोंदलगाव' हे गाव दत्तक घेतले होते. या गावात पावसाळा संपून दिवाळी जवळ आली की, दरवर्षी टँकरने पाणीपुरवठा करावा लागायचा,




अशी माहिती नदीतज्ज्ञ आनंद असोलकर यांनी दिली. निजाम काळात हे गाव गोठ्यांबद्दल आणि संत्र्यांसाठी प्रसिद्ध होते, ज्या जवळच्या करंजगाव रेल्वे स्थानकावरून देशाच्या इतर भागांत पाठवल्या जायच्या. परंतु, स्थानिक नदीवरील बंधाऱ्यांमध्ये गाळ साचल्यामुळे, मोसंबीची झाडे जोपासणे किंवा वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेणे शक्य नव्हते. 'नाम फाऊंडेशन'च्या स्थापनेनंतर मकरंद अनासपुरे आणि नाना पाटेकर एका अशा गावाच्या शोधात होते जिथे जलसंधारण प्रकल्प राबवता येईल... मी त्यांना धोंदलगावबद्दल सांगितले... ते २ ऑक्टोबर २०१५ रोजी येथे आले आणि त्यांनी या कामाचे उद्घाटन केले, असे असोलकरांनी 'पीटीआय'ला सांगितले.



राणी लक्ष्मीबाई महिला मंडळाच्या वतीने

# महिलांसाठी ‘रास गरबा नाईट’ स्पर्धेचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – राणी लक्ष्मीबाई महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी भव्य ‘रास गरबा नाईट’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या १४ ऑक्टोबरला सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाकर बेले प्लॉट, बस स्टँडजवळ, शेदुंरजनाघाट येथे हा कार्यक्रम होणार आहे. या स्पर्धेत केवळ महिलांनाच सहभाग घेता येणार असून एका ग्रुपमध्ये १५ ते १६ महिलांचा समावेश असणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी वयोमर्यादा नसून प्रवेशासाठी नोंदणी करणे अनिवार्य असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पाचवे क्रमांक तसेच ‘बेस्ट मेकअप’ आणि ‘बेस्ट कॉस्च्युम’ अशा विविध पुरस्कारांनी सहभागी महिलांना गौरविण्यात येणार आहे तसेच उपविजेता ग्रुपला विशेष प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे.

शेंदुरजनाघाट शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या रास गरबा नाईटचा आनंद घ्यावा, असे आवाहन राणी लक्ष्मीबाई महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पूर्णेकर हत्याप्रकरणी यादव, पवारला पुन्हा पोलीस कोठडी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**ठाणे** – ठाकरे गटाचे मानपाडा विभागप्रमुख प्रदीप उर्फ बाळू पूर्णेकर यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या निखिल यादव आणि नितेश पवार या दोघांना ठाणे न्यायालयाने गुरुवारी पुन्हा पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दोघांची कोठडी १३ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात



आली आहे. हा हल्ला पूर्वनियोजित कटाचा भाग असल्याचा दावा पोलिसांनी न्यायालयात केला. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी पिस्तूल चालविण्याचे प्रशिक्षण घेतले होते. हल्ल्यासाठी दोन पिस्तूल आणि तीन चॉपरचा वापर झाल्याचे तपासात समोर आले आहे. २९ सप्टेंबरच्या रात्री पूर्णेकर यांच्या कार्यालयात पाच जणांनी गोळीबार करून चॉपरने हल्ला केला होता. गंभीर जखमी पूर्णेकर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# जिल्हास्तरीय राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत मानधन सन्मान योजना समितीमध्ये कमलाकर देशमुख

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – माजी तहसिलदार कमलाकर देशमुख यांची जिल्हास्तरीय राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना समितीमध्ये सदस्य म्हणुन निवड झाली आहे.



राज्याचे महलसुल मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नामनिर्देशित केल्यानुसार जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना समिती स्थापन करुन त्यामध्ये कलाकार म्हणुन माजी तहसिलदार, अष्टपैलु व्यक्तीमत्व, सिनेकलावंत, सर्पमित्र कमलाकर देशमुख यांची नियुक्ती करण्यांत आली आहे.

राजश्री शाहू महाराज जेष्ठ साहित्यीक व कलावंत यांना मानधन सन्मान योजनेबाबत ही समिती असून जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष तर जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे सचिव असतील. संपुर्ण जिल्हयातील विविध भागातून १० सदस्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये कमलाकर देशमुखा यांचा समावेश आहे.

त्यांच्या नियुक्तीमुळे एका हरहुन्नरी कालाकाराचा सन्मान झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहे. याबाबत शासनाने नोंद घेतल्याबाबत वरुड, मोर्शी तालुक्यात आनंद व्यक्त केल्या जात असुन त्यांच्या चाहत्यांनी त्यांचे निवासस्थानी जावुन पूष्पगुच्छ देवुन अभिनंदन केले आहे.

# भारतीय वैमानिकाच्या शौर्याला इस्त्रायलचा सलाम!

## स्मित मच्छर यांना नागरी शौर्य पुरस्कार जाहीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – फ्लायदुबईच्या विमानातील प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी धैर्याने परिस्थितीचा सामना करणारे भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छर यांचा इस्त्रायलच्या वतीने सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात कथित हल्ल्याची घटना घडली होती. या संकटाच्या वेळी कॅप्टन मच्छर यांनी दाखवलेल्या धैर्याची दखल घेत त्यांना नागरी शौर्य पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे वृत्त आहे.




विमानात नेमकं काय घडलं? मिळालेल्या माहितीनुसार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या विमानात उड्डाणादरम्यान सहवैमानिकाने कॅप्टन स्मित मच्छर यांच्यावर हल्ला केला. या घटनेमुळे विमानातील परिस्थिती गंभीर बनली. विमानाची उंची अचानक कमी होऊ लागल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली.

हल्ल्यात गंभीर जखमी झाल्यानंतरही कॅप्टन मच्छर यांनी परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कॉकपिटचा दरवाजा उघडण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर विमानातील सहा इस्त्रायली नागरिकांनी पुढाकार घेत हल्लेखोराला रोखले. विमानातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. अखेर विमानाचे सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर सुरक्षित लँडिंग करण्यात आल्याची माहिती आहे.

# नाशिकमध्ये सायबर चोरट्यांचा धुमाकूळ!

## शेअर मार्केट, टास्क स्कॅम आणि व्यवसायातील भागीदारीच्या आमिषाने १ कोटींची फसवणूक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – झटपट श्रीमंत होण्याच्या मोहाचा फायदा घेत सायबर भामट्यांनी नाशिक शहरात फसवणुकीचे जाळे पसरवले आहे.

शेअर मार्केटमध्ये मोठा परतावा, ऑनलाइन टास्कद्वारे घरबसल्या कमाई आणि व्यवसायात भागीदारी देण्याचे आमिष दाखवून शहरातील नागरिकांना तब्बल १ कोटी ७ लाख ५९ हजार रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. या प्रकरणी गंगापूर, नाशिकरोड आणि सायबर पोलीस ठाण्यांत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शेअर मार्केटमध्ये मोठ्या नफ्याचे आमिष भोवले शेअर बाजारात गुंतवणूक करून



अल्पावधीत मोठा नफा मिळवण्याच्या आमिषाने मखमलाबाद नाका परिसरातील नागरिकांची फसवणूक करण्यात आली. संशयितांनी ‘वैल्थ डिस्कशन २३’ या व्हॉट्सअॅप व सोशल मीडिया ग्रुपच्या माध्यमातून तसेच विविध मोबाईल क्रमांकांवरून फिर्यादींशी संपर्क साधला. त्यामुळे विश्वास बसलेल्या फिर्यादी आणि त्यांच्या साथीदारांनी टप्प्याटप्प्याने विविध बँक खात्यांमध्ये एकूण ७५ लाख ९ हजार ६६२ रुपये जमा केले.

# शिवडी परिसरातील पदपथांवरील ०७ अनधिकृत दुकाने, १५ तात्पुरते शेडवर कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पदपथांवर पादचाऱ्यांना सुलभपणे मार्गक्रमण करता यावे, यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून ‘पादचारी प्रथम’ अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत, शिवडी परिसरातील डी. जी. महाजनी व जेरबाई वाडीया मार्गालगतच्या पदपथावर अडथळा निर्माण करणारी ०७ अनधिकृत दुकाने, १५ तात्पुरते ताडपत्रीचे शेड, ०२ अनधिकृत कट्टे आणि २० फेरीवाल्यांवर गुरुवारी ०८ ऑक्टोबर २०२६



रोजी कारवाई करण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनात, पदपथांवरील अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणे तत्काळ हटवून पदपथ अडथळामुक्त करण्यासाठी महानगरपालिकेकडून ’पेडेस्ट्रियन फर्स्ट’ अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, उपायुक्त प्रशांत सपकाळे यांच्या मार्गदर्शनात सहायक आयुक्त वृषाली इंगुले यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या या कारवाईत शिवडी येथील डी. जी. महाजनी व जेरबाई वाडीया मार्गालगतचे पदपथ मोकळे करण्यात आले. या अंतर्गत, पदपथांवर उभारण्यात आलेली ०७ अनधिकृत दुकाने, १५ तात्पुरते ताडपत्रीचे शेड, ०२ अनधिकृत कट्टे, ०४ बेवारस साहित्य साठवण ठिकाणे आणि २० फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

# सिंहरथ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मोठा निर्णय ? त्र्यंबकेश्वर मंदिर दोन महिने दर्शनासाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये सुरू असलेली विकासकामे वेगाने पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचा पर्याय विचाराधीन आहे.

भाविकांची मोठी गर्दी आणि सुरू असलेल्या बांधकामांमुळे कामांना अडथळे येत असल्याने त्र्यंबकेश्वर मंदिर दोन महिन्यांसाठी भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.



मात्र, मंदिरातील नियमित पूजा-अर्चा सुरू राहणार असून, दर्शन बंद ठेवण्याबाबतचा अंतिम निर्णय देवस्थानच्या विश्वस्त मंडळाकडून घेतला जाणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी विकासकामे पूर्ण करण्याचे आव्हान सिंहस्थ कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये विविध विकासकामांना गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दर्शन पथाची निर्मिती, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, कुशावर्त तीर्थ परिसराचा विकास, प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार, घाटांची उभारणी, फरशी बदलणे आणि गोदावरी नदी प्रवाही करण्याच्या योजनेसह अनेक कामे सध्या प्रगतिपथावर आहेत.

पीएम श्री न.प.उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे

# ऑपरेशन कवच अंतर्गत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – पीएम श्री न.प.उच्च प्राथमिक शाळा क्र.४ येथे ‘ऑपरेशन कवच’अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

पोलिस स्टेशनचे सहायक ठाणेदार मनोरथ राठोड व त्यांच्या पथकाने विद्यार्थ्यांना सायबर हल्ले, ऑनलाईन फसवणुक, सायबर धोके, सोशल मीडिया व इंटरनेटच्या सुरक्षित वापराबाबत मार्गदर्शन केले. अनोळखी लिंक, संदेश व फोनला प्रतिसाद देताना घ्यावयाची काळजी तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचावाच्या उपाययोजनाही समजावुन सांगण्यात आल्या.

कार्यक्रमाचे संचालन पकंज चाफले तर आभार नंदकिशोर नागपुरे यांनी मानले. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका कांता हरले, प्रशासन अधिकारी माधव तिडके यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

# ‘मिशन नवोदय’ हा उपक्रमात तालुक्यातून ११ विद्यार्थांची निवड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी केला शिक्षकांचा सत्कार

**वरुड** – ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत पुढे जावेत हा उद्देश ठेऊन अमरावती जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकारी सत्यम गांधी यांच्या संकल्पनेतून ‘मिशन नवोदय’ हा उपक्रम नुकताच राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत तालुक्यातून ११ विद्यार्थी परीक्षेतून निवडल्या गेले. जिल्ह्यातून वरुड तालुका दुसऱ्या क्रमांकावर आला आहे, हे येथे उल्लेखनीय! ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवोदय



परीक्षेसाठी तयारी करता यावी यासाठी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. पहिली परीक्षा जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांनी दिली. त्यातील ६६१ विद्यार्थी प्रथम फेरीत गुणवत्ता यादीत आले. या ६६१ विद्यार्थ्यांमधून ८० विद्यार्थ्यांची निवड जिल्हा परिषदला करायची होती. घेण्यात आलेल्या दुसऱ्या परीक्षेत अमरावती येथे मिशन नवोदय निवासी शिबिराकरीता तालुक्यातील ११ विद्यार्थी निवडले गेले.

यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांमागे मार्गदर्शन करणारे शिक्षक असतात ही जाणीव ठेवत पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी नुकताच यशस्वी झालेल्या ११ विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचा पंचायत समितीमध्ये सत्कार केला. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आपणाकडून लाभल्याने आपणा सर्व शिक्षकांचा अभिमान असल्याचे यावेळी ते म्हणाले. विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांना अमरावती जिल्हा परिषदे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सिद्धेश्वर काळुसे यांचे सातत्याने प्रोत्साहन मिळत असल्याने शिक्षक व आम्हालाही कार्य करण्यास सकारात्मक उर्जा निर्माण झाल्याचे विनोद गाढे यांनी सांगितले.

पंचायत समिती स्तरावर सत्कार झालेल्या शिक्षकांमध्ये खुशाल अंबाडकर (जि.प.शाळा खडका), विवेक देवते (पुसला), शैलेश बोथे (चांदस), मिना सोनकुसळे, जया बारमासे (पुसला), अंजली पोटे (गव्हांणकुंड), सुनिता वानखडे (काटी), स्मिता काळे (पुसली), सुरेखा पोकळे(करजगांव) यांचा समावेश आहे.

सत्कार समारंभाला विस्तार अधिकारी मोहन नारिंगे, केंद्रप्रमुख भुपेश वानखडे, शिक्षक चंदन आडे, विषय साधन व्यक्ती निलेश मोहोकार व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय

**रोजच्या प्रार्थनेत शब्द नसतील तरीही चालेल, पण हृदय हवे**

## सत्तेचा अहंकार आणि जनतेचा आक्रोश

लोकशाहीच्या अस्तित्वासाठी जनतेचा आवाज ऐकणे हीच सत्ताधाऱ्यांची खरी कसोटी! लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका जिंकणे, सत्तेचा खुर्ची मिळवणे आणि प्रशासनावर नियंत्रण ठेवणे नव्हे, तर लोकांच्या अपेक्षा समजून घेणे, त्यांच्या प्रश्नांना न्याय देणे आणि जनतेच्या विश्वासाला पात्र ठरणे होय. मात्र, जेव्हा सत्तेची ताकद जनसेवेऐवजी अहंकाराचे साधन बनते, तेव्हा सामान्य माणसाच्या मनात असंतोष निर्माण होऊ लागतो. हाच असंतोष पुढे जनआक्रोशाचे रूप धारण करतो. सत्तेचा अहंकार आणि जनतेचा आक्रोश यांच्यातील संघर्ष हा केवळ राजकीय संघर्ष नसून लोकशाहीच्या मूल्यांची परीक्षा घेणारा निर्णायक टप्पा असतो. सत्ता ही जनतेने दिलेली जबाबदारी आहे, कोणाचीही कायमस्वरूपी मालमत्ता नाही.** हा लोकशाहीचा मूलभूत सिद्धांत आहे. जनतेच्या मतांवर निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे अपेक्षित असते. परंतु सत्तेच्या वतुर्ळात एकदा प्रवेश मिळाला की काही राजकीय नेत्यांना जनतेच्या अडचणींपेक्षा स्वतःची प्रतिमा, राजकीय वर्चस्व आणि सत्तेचे संरक्षण अधिक महत्त्वाचे वाटू लागते. विरोधकांनी उपस्थित केलेले प्रश्न म्हणजे विकासातील अडथळे, टीका म्हणजे विरोध आणि जनतेने केलेली मागणी म्हणजे राजकीय कटकारस्थान, अशी मानसिकता निर्माण झाली तर लोकशाहीच्या आरोग्यासाठी ती धोक्याची घंटा ठरते.

जनतेचे प्रश्न आणि सत्तेची उत्तरे आज सामान्य नागरिकांसमोर अनेक प्रश्न उभे आहेत. महागाईमुळे वाढणारा आर्थिक ताण, तरुणांमधील बेरोजगारी, शिक्षणाचा वाढता खर्च, शेतमालाला मिळणारा अपेक्षित भाव, आरोग्यसेवेतील अडचणी आणि ग्रामीण भागातील अपुऱ्या सुविधा या समस्या केवळ भाषणांनी सुटणार नाहीत. त्यासाठी ठोस धोरणे, पारदर्शक प्रशासन आणि प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे.

शेतकरी दिवसरात्र कष्ट करून अन्नधान्य पिकवतो; परंतु नैसर्गिक संकटे, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे त्याच्या आर्थिक स्थैर्याला वारंवार धक्का बसतो. दुसरीकडे, शिक्षण पूर्ण केलेला तरुण हातात पदवी घेऊन रोजगाराच्या संधी शोधत असतो. परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारदर्शक भरती प्रक्रिया आणि गुणवत्तेच्या आधारे संधी मिळण्याची अपेक्षा असते. अशा वेळी सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांवर उत्तरदायित्व स्वीकारण्याऐवजी केवळ घोषणांचा आधार घेतला, तर असंतोष वाढणे स्वाभाविक आहे. विकासाच्या घोषणा आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यांच्यातील अंतर कमी करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. मोठे प्रकल्प, भव्य कार्यक्रम आणि आकर्षक जाहिराती यांना विरोध असण्याचे कारण नाही; मात्र त्याचबरोबर सामान्य माणसाच्या जीवनमानात प्रत्यक्ष सुधारणा होत आहे का, याचाही हिशेब दिला पाहिजे.




# मैत्रीला संशयाची चौकट का?

## स्त्री-पुरुष नात्यांकडे पाहण्याची मानसिकता, समाजकार्य आणि आत्मचिंतन

स्त्री आणि पुरुष यांच्यात मैत्री असू शकते का? या प्रश्नाचे उत्तर देताना आजही आपल्या समाजाला अनेक पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो. दोन व्यक्ती एकमेकांशी मोकळेपणाने बोलत असतील, एकमेकांना समजून घेत असतील, अडचणीच्या काळात साथ देत असतील, तर त्यांच्या नात्याला लगेच प्रेम, आकर्षण किंवा अन्य कोणत्यातरी संशयाच्या चौकटीत का बसवले जाते?

मुळात मैत्रीला लिंग नसते. मैत्रीचा पाया असतो विश्वास, आदर, समजूतदारपणा, संवाद आणि परस्परांच्या मर्यादांचा सन्मान. कधी कधी एखाद्या महिलेला एखाद्या पुरुष मित्राशी काही विषय अधिक सहजपणे बोलता येतात. कारण तो तिचे म्हणणे स्पर्धेच्या किंवा तुलनेच्या भावनेतून न पाहता शांतपणे ऐकून घेतो. त्याचप्रमाणे एखाद्या पुरुषालाही एखाद्या महिला मैत्रिणीकडून भावनिक आधार, वेगळा दृष्टिकोन किंवा समजून घेणारा संवाद मिळू शकतो. याचा अर्थ प्रत्येक जवळीक प्रेमसंबंध आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरेल का?

प्रत्येक जवळीक म्हणजे प्रेम नसते. प्रत्येक संवाद म्हणजे अफेअर नसते. प्रत्येक काळजीमागे स्वार्थ नसतो. नक्कीच, प्रत्येक नाते निर्दोषच असेल असेही नाही. काही संबंधांमध्ये मर्यादा ओलांडल्या जाऊ शकतात, गैरवर्तन होऊ शकते किंवा विश्वासाचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. म्हणूनच कोणत्याही नात्याकडे डोळे झाकून पाहण्याऐवजी वर्तन, पारदर्शकता, परस्पर संमती, मर्यादा आणि आदर हे निकष महत्त्वाचे ठरतात.

मात्र काही चुकीच्या अनुभवांच्या आधारे प्रत्येक स्त्री–पुरुष मैत्रीकडे संशयाने पाहणे हीसुद्धा अन्यायकारक मानसिकता आहे.




**समानता फक्त पुरुषांनीच नाही तर स्त्रियांनीही समजून घेण्याची गोष्ट आहे. समानता हा शब्द आपण फार सहजतेने उच्चारतो, पण आपल्या वागणुकीत मात्र तो सहजपणे येत नाही. या समानतेत एका पुरुषाला त्याच्या मैत्रिणीसोबत फिरायला जाता येईल आणि त्याचा कोणताही अन्य अर्थ इतर लोक काढणार नाहीत. या समानतेत स्त्री–पुरुष एकमेकांकडे त्यांच्या गुणांमुळे, विचारांमुळे एकत्र येतील; इतर गोष्टी दुय्यम असतील. आणि ही समानता आणणं, ती राबवणं ही फक्त पुरुषांची जबाबदारी असणार नाही.**

समाजकार्याच्या क्षेत्रात हा प्रश्न अधिक गंभीर होतो समाजकार्य म्हणजे विविध वयोगटातील, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील स्त्री–पुरुषांनी एकत्र येऊन काम करणे. बैठका, प्रशिक्षण, प्रवास, क्षेत्रभेटी, जनजागृती, आंदोलन, संघटन बांधणी, समुपदेशन अशा अनेक प्रक्रियांमध्ये परस्पर संवाद अपरिहार्य असतो.

विशेषतः महिलांच्या प्रश्नांवर काम करताना महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांमध्ये संवाद आणि सहकार्य असणे स्वाभाविक आहे. अशा प्रत्येक सहकार्याकडे संशयाच्या नजरेने पाहिले तर सामाजिक कामाचीच कोंडी होईल.




दुर्दैवाने, समाजपरिवर्तन, पुरोगामित्व किंवा प्रबोधनाची भाषा करणाऱ्या काही मंडळींकडूनही कधी कधी व्यक्तीच्या कामापेक्षा तिच्या वैयक्तिक संबंधांवर चर्चा अधिक केली जाते. एखाद्या कार्यकर्त्याच्या कामावर, विचारांवर किंवा भूमिकेवर मतभेद असतील तर त्यावर वैचारिक चर्चा व्हायला हवी. परंतु एखाद्या स्त्री–पुरुषाच्या मैत्रीबद्दल संशय निर्माण करून त्याची सामाजिक प्रतिमा खराब करणे किंवा त्याच्या कामाला अडथळा आणणे हा वेगळाच प्रश्न आहे.

कामाचे मूल्यमापन कामावरून व्हावे; नात्यांच्या अफवांवरून नव्हे. स्वतः हा आपल्या कार्यावर विश्वास ठेऊन प्रगती करावी. दुसऱ्या च्या कामात अडचणी निर्माण करण्यासाठी जास्तीच्या उठाठेवी करणं योग्य नव्हे.

संशय हा पुरावा नसतो आणि अफवा ही सत्याची जागा घेऊ शकत नाही. सत्य हे सत्यच असत आणि इथेच आत्मचिंतनाची गरज आहे हा लेख कोणालाही वैयक्तिकरीत्या लक्ष्य करण्यासाठी नाही. उलट, तो आत्मचिंतनासाठी आहे आरोप करणाऱ्यांसाठीही आणि आरोप सहन करणाऱ्यांसाठीही.

ज्यांच्यावर संशय घेतला जातो त्यांनीही स्वतःला काही प्रश्न विचारायला हवेत आपल्या वागण्यात अशी कोणती गोष्ट आहे का जी गैरसमजाला कारणीभूत ठरू शकते? आपण नात्यांच्या मर्यादा स्पष्ट ठेवतो का? आपल्या वर्तनात पारदर्शकता आहे का? समोरच्या व्यक्तीच्या सन्मानाचा आपण पुरेसा विचार करतो का?

आणि ज्यांना इतरांच्या नात्यांबद्दल संशय वाटतो त्यांनीही स्वतःला विचारायला हवे आपल्याकडे ठोस तथ्य आहे का? की आपण ऐकीव माहितीवर प्रतिक्रिया देत आहोत? आपल्या मनात आधीपासून असलेल्या स्त्री–पुरुष संबंधांविषयीच्या पूर्वग्रहांचा प्रभाव तर नाही ना? आपल्या शब्दांमुळे एखाद्या व्यक्तीची प्रतिष्ठा, मानसिकता किंवा सामाजिक काम बाधित होणार नाही ना?

कारण आत्मचिंतनाची गरज केवळ आरोप झालेल्यांना नसते; आरोप करणाऱ्यांनाही असते. विचारपीठावर स्त्री–पुरुष समानतेची भाषा करणे सोपे आहे; पण प्रत्यक्ष जीवनात त्या समानतेवर विश्वास ठेवणे ही खरी कसोटी आहे. स्त्री आणि पुरुष एकत्र काम करू शकतात, मैत्री करू शकतात, एकमेकांना आधार देऊ शकतात आणि तरीही त्या नात्याला सन्मानाची चौकट असू शकतेङ्कही सामाजिक समज विकसित होणे गरजेचे आहे.

शेवटी प्रश्न स्त्री–पुरुष मैत्रीचा नाही; प्रश्न आहे आपल्या नजरेचा. आपण नात्याकडे विश्वासाने पाहतो की संशयाने? आपण तथ्य तपासतो की अफवांवर विश्वास ठेवतो? आपण व्यक्तीच्या कामाकडे पाहतो की तिच्या वैयक्तिक आयुष्याचा अर्थ लावतो?

कधी कधी नातं चुकीचं नसतं; नात्याकडे पाहण्याची नजर चुकीची असू शकते.

म्हणूनच स्त्री–पुरुष मैत्रीला संशयाच्या चौकटीत अडकवण्याऐवजी नात्यांमध्ये मर्यादा, पारदर्शकता, आदर आणि विश्वास यांना महत्त्व देऊया. समाजकार्याच्या क्षेत्रात व्यक्तीचे मूल्यमापन तिच्या कामावरून करूया. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजेङ्कइतरांकडे बोट दाखवण्यापूर्वी स्वतःच्या विचारांची, वर्तनाची आणि दृष्टिकोनाची एकदा तपासणी करूया.

कारण खरे परिवर्तन केवळ समाज बदलण्यापासून सुरू होत नाही; ते स्वतःच्या नजरेत बदल करण्यापासून सुरू होते.ते विचारात घेऊन खरं आत्मचिंतनाची गरज आहे.



प्रफुल्ल मंदा श्रीधर (कुकडे )
सामाजिक कार्यकर्ता
मो. न. ९६६५१८५४२८

# फ्रान्समध्ये विद्यार्थ्यांचा उद्रेक का झाला?

आंदोलक व्यवस्थेला एक आरसा दाखवत आहेत. त्या आरशात त्यांनः स्वतःचे भविष्य दिसत आहे. आणि ते भविष्य सुरक्षित आहे की असुरक्षित हाच प्रश्न ते सरकारला विचारत आहेत.

फ्रान्स हा जगातील प्रगत, लोकशाहीवादी आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक देश म्हणून ओळखला जातो. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांबाबत फ्रान्सने जगासमोर अनेक आदर्श निर्माण केले आहेत. मात्र आज याच फ्रान्समध्ये वर्गखोल्यांमधून असंतोषाचा आवाज रस्त्यावर पोहोचला आहे. विद्यार्थी आंदोलनाच्या निमित्ताने उभा राहिलेला हा प्रश्न केवळ शिक्षकांची कमतरता, शाळांच्या जीर्ण इमारती किंवा सरकारी निधीपुरता मर्यादित नाही. तो एका संपूर्ण पिढीच्या भविष्याविषयीच्या चिंतेचा आणि व्यवस्थेवरील कमी होत चाललेल्या विश्वासाचा आरसा आहे.




६ ऑक्टोबरला फ्रान्समधील ४० हून अधिक शहरांमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, विद्यापीठीय तरुण आणि कामगार संघटनांचे सदस्य रस्त्यावर उतरले. सरकारी आकडेवारीनुसार सुमारे २.५ लाखांहून अधिक लोक सहभागी झाले, तर आंदोलकांचा दावा त्याहून मोठा आहे. या आंदोलनाची सुरुवात पॅरिसच्या उपनगरातील एका शाळेत शिक्षकांच्या रिक्त जागा आणि अपुऱ्या साधनसामग्रीविरोधात झालेल्या निदर्शनांपासून झाली. काही दिवसांतच त्याचे रूप राष्ट्रीय आंदोलनात झाले. देशातील सुमारे ३,७०० उच्च माध्यमिक शाळांपैकी मोठ्या संख्येने शाळा बंद किंवा आंदोलनामुळे बाधित झाल्या. विद्यार्थ्यांच्या मागण्या वरकरणी साध्या वाटतात. रिक्त शिक्षक पदे भरावीत, अनुपस्थित शिक्षकांच्या जागी पर्यायी शिक्षक उपलब्ध करून द्यावेत, वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या कमी करावी, जीर्ण शाळांची दुरुस्ती करावी आणि शिक्षणाची गुणवत्ता सुधारावी. मात्र या मागण्यांच्या पाठीमागे एक मोठा आणि अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. आमच्या भविष्याचे काय? हा प्रश्न समजून घेणे महत्त्वाचे आहे.

कारण आजचा विद्यार्थी ज्या जगात मोठा होत आहे ते जग त्याच्या पालकांच्या पिढीपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. हवामान बदलामुळे भविष्यातील जीवनमानासमोर गंभीर आव्हाने उभी आहेत. महागाई आणि घरांच्या वाढत्या किंमतींमुळे मध्यमवर्गावर आर्थिक दबाव वाढत आहे. उच्च शिक्षणात प्रवेश मिळिवण्याची स्पर्धा तीव्र होत आहे आणि पदवी मिळाल्यानंतरही रोजगाराची हमी राहिलेली नाही. अशा परिस्थितीत शाळा ही विद्यार्थ्यांसाठी आशेची, संधीची आणि सुरक्षिततेची जागा असायला हवी. परंतु शाळाच जर अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि असमान संधींचे प्रतीक बनू लागली, तर विद्यार्थ्यांच्या मनात असंतोष निर्माण होणारच. फ्रान्समधील आंदोलनाची खरी गंभीरता याच ठिकाणी आहे.

काही शाळांमध्ये गळणारी छपरे, खराब स्वच्छतागृहे, अपुरी साधने, उष्णतेच्या काळात असह्य होणाऱ्या वर्गखोल्या आणि शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे रद्द होणारे तास यासारख्या समस्या आहेत. वर्गांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातील शाळांना या अडचणींचा अधिक सामना करावा लागतो. म्हणजेच शिक्षणव्यवस्थेतील समस्या केवळ गुणवत्तेच्या नाहीत; त्या सामाजिक विषमतेच्याही आहेत. शिक्षण हे सामाजिक समतेचे सर्वांत प्रभावी साधन मानले जाते.

विद्यार्थ्यांच्या अस्वस्थतेला केवळ 'तरुणाईचा उतावळेपणा' म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. इतिहास सांगतो की, विद्यार्थ्यांची आंदोलने अनेकदा समाजातील खोलवरचे बदल सूचित करतात. १९६८ मधील फ्रान्सचे विद्यार्थी आंदोलन हे त्याचे प्रसिद्ध उदाहरण. त्या काळात तरुणांनी केवळ विद्यापीठातील प्रश्न मांडले नव्हते; त्यांनी संपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. आजची परिस्थिती वेगळी असली तरी तरुणांच्या अस्वस्थतेत एक समान धागा आहे. स्थापित व्यवस्थेने त्यांचे भविष्य ठरवू नये; त्यांना स्वतःचे भविष्य घडविण्याची संधी द्यावी.

मात्र आजच्या फ्रान्समधील आंदोलनाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना मिळणारा व्यापक सामाजिक पाठिंबा. शिक्षक, पालक आणि कामगार संघटना त्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ पुढे आल्या आहेत. याचा अर्थ हा प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचा उरलेला नाही. सार्वजनिक शिक्षणव्यवस्था कशी असावी, तिच्यासाठी किती निधी असावा आणि तिची जबाबदारी कोणाची, हा मूलभूत प्रश्न समाजासमोर उभा राहिला आहे.

या आंदोलनाला हिंसक वळण मिळणे मात्र चिंताजनक आहे. काही ठिकाणी तोडफफोड, जाळपोळ, पोलिसांशी संघर्ष आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले. पोलिसांनीही अश्रुधूर आणि अन्य नियंत्रणात्मक उपायांचा वापर केला. विद्यार्थी आणि पोलिस जखमी झाले, अनेकांना ताब्यात घेण्यात आले. तरुणांच्या प्रश्नांना लाठीने उत्तर देता येत नाही; त्यासाठी संवादाची गरज असते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# बंडोबांना थंड करण्यासाठी भाजपच्या वरिष्ठांचाही जोरदार प्रयत्न : नितीन गडकरींचा अनिल सोलेंना फोन, पण...

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या रणनीतीसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी भाजपच्या कोअर कमिटीची बैठक झाली.

पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत भाजपचे नेते आणि बंडखोर उमेदवार अनिल सोले यांच्या भूमिके संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीत नितीन गडकरी यांनी अनिल सोले यांच्याशी संपर्क साधण्याच्या सूचना दिल्या. सोबतच बैठकीतूनही सोले यांना दूरध्वनीवर संपर्क साधण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र सोले यांचा मोबाईल बंद असल्याने संपर्क त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

किंबहुना सोले यांच्या निकटवर्तीयांचे ही मोबाईल बंद असल्यामुळे भाजपच्या चिंतेत वाढ झाली आहे. विशेष म्हणजे भाजपचे माजी आमदार गिरीश व्यास यांच्या बडकस चौकावरील कार्यालयात सोले यांचे प्रचार कार्यालय राहणार आहे.

त्यामुळे अनिल सोलेंच बंड शमवण्यात भाजपच्या पक्षश्रेष्ठींना यश येतं का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. अनिल सोले हे गेल्या दोन दिवसांपासून संपर्क क्षेत्राच्या बाहेर विधान परिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघ निवडणुकीतील लढतीचे चित्र आज स्पष्ट होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस असून भाजपचे बंडखोर आणि माजी आमदार प्राध्यापक अनिल सोले त्यांचे अर्ज परत घेतात का? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. प्रा. अनिल सोले हे गेल्या दोन दिवसांपासून संपर्क क्षेत्राच्या बाहेर असल्याने भाजपची चिंता वाढली आहे.

# एअर इंडिया, अकासाचा प्रवास महागणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – विमान इंधनाच्या (जेट फ्युएल) वाढलेल्या किमतींच्या पार्श्वभूमीवर, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसने ९ ऑक्टोबरपासून लागू होणाऱ्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांच्या इंधन अधिभारात (फ्युएल सरचार्ज) वाढ करण्याची घोषणा गुरुवारी केली. अकासा एअरनेही देशांतर्गत उड्डाणांसाठी




इंधन अधिभार (फ्युएल सरचार्ज) पुन्हा लागू केला असून, ९ ऑक्टोबरपासून आंतरराष्ट्रीय सेवांसाठीच्या अधिभारातही वाढ केली आहे.

एअर इंडियाने म्हटले आहे की, भू-राजकीय घडामोडी आणि जागतिक ऊर्जा बाजारावरील सततच्या दबावामुळे ॲव्हिएशन टर्बाइन फ्युएलच्या किमतींमध्ये अलिकडच्या महिन्यांत मोठी अस्थिरता दिसून आली आहे.कंपनीने म्हटले आहे की, इंधन किमतींमधील ताज्या वाढीमुळे विमान कंपन्यांचा ऑपरेशनल खर्च आणखी वाढला आहे. विमान कंपन्यांच्या एकूण खर्चाचा एक मोठा हिस्सा इंधनावरच खर्च होतो.

### एमकेएम इंग्लिश स्कूलमध्ये

# गांधी जयंती व शास्त्री जयंती उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथील एम.के.एम. इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात शाळेतील प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध उपक्रम सादर केले. महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांकडून दांडी मार्चचे सुंदर सादरीकरण करण्यात आले. तसेच देशभक्तीपर कार्यक्रम, भाषणे व विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक अझहर क्वाझी, उपमुख्याध्यापिका आलिया कुरेशी, हिना क्वाझी तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या विचारांवर आधारित सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना सत्य, अहिंसा, साधेपणा, देशप्रेम आणि स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.

# अमरावती तहसील कार्यालयात सेवा संकल्प अभियानांतर्गत महाराजस्व समाधान शिबिर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**अमरावती** – 'सेवा संकल्प अभियानां'तर्गत अमरावती तहसील कार्यालयात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करून नागरिकांना विविध शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली सुलभतेने उपलब्ध करून देण्यात आला.

उपविभागीय अधिकारी अनिल भटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती येथे ६ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वा. हे शिबिर आयोजित करण्यात आले. या अनुषंगाने अमरावती तालुक्यातील शिबिराचे आयोजन तहसील कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती येथे ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजता करण्यात आले. शिबिरात प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप, पाणंद रस्ते उपलब्ध करून देणे, पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र देणे, वन हक्क दावे मंजूर करणे, मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे, नळ जोडणी देणे, मालमत्ता कराची आकारणी व मागणीपत्र देणे, वीज जोडणीसाठी मालमत्ताधारकाचे नाव नोंदविणे, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे आदी महसूलविषयक सेवा देण्यात आल्या. यासोबतच बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरीसाठी पात्र लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी, दिव्यांग व विवाह नोंदणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, जन्म-मृत्यू नोंदणी व प्रमाणपत्र, शिकाऊ वाहन चालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप, ७/१२ व ८-अ नोंदी अद्ययावत करणे तसेच इतर खात्यांच्या विशेष सहाय्य योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

या विविध सेवांचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. शिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी मिळाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला.

# मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या सुरक्षेत वाढ : 'झेड प्लस' सुरक्षा अजून मजबूत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना आधीच 'झेड प्लस' सुरक्षा कवच मिळाले आहे. मात्र, या आठवड्यात त्यांच्या विरोधात तीव्र निदर्शने सुरू असून, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयुक्तांवर 'मतचोरीचा' गंभीर आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्तांची सुरक्षा आणखी कडक करण्यात आली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणामधील (एसआयआर) गैरव्यवहारांच्या मुद्द्यावरून काँग्रेस आणि विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी आक्रमकपणे रेटून धरली आहे, ज्यामुळे रस्त्यावरील आंदोलने अधिक तीव्र झाली आहेत.

आंदोलकांनी आयुक्तांच्या निवासस्थानाजवळ धडक दिल्यानंतर आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या इतर ठिकाणच्या घराबाहेर निदर्शने केल्यानंतर सुरक्षेमध्ये ही वाढ करण्यात आली आहे.

# विरोधकांना संपवण्यासाठीच एसआयआर - अभिजीत दिपके

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**बेंगळुरू** – एसआयआर अंतर्गत मतदार यादीतून नावे वगळण्याची मोहीम ही भाजपच्या विरोधात असणाऱ्यांचा मताधिकार हिरावून घेण्यासाठीच राबवली जात आहे, असा गंभीर आरोप कॉकरोच जनता पक्षाचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांनी केला आहे. बेंगळुरू येथे विविध नागरी समाज संघटनांच्या वतीने आयोजित केलेल्या 'पीपल्स ट्रिब्युनल' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी, ज्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत असे नागरिक प्रत्यक्ष हजर होते, जे आपण अजून जिवंत असल्याचे दाखवून देत होते. हा' लोकशाहीचा मृत्यू ज्या लोकांना मृत घोषित केले गेले, ते आज इथे जिवंत उभे आहेत. त्यामुळे मृत्यू या लोकांचा झालेला नाही, तर या देशाच्या लोकशाहीचा मृत्यू झाला आहे, असे दीपके म्हणाले.मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सांगण्यावरून मुख्य निवडणूक आयुक्तांसह निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांची नावे मतदार यादीतून कमी केल्याचा आरोप त्यांनी केला.

### आमदार उमेश यावलकरांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या बससेवेमुळे

# लोणी परिसरातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – लोणी येथील श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयासोबतच इतर शाळांमध्ये लोणी परिसरातील गावातील विद्यार्थी शिक्षणाचे धडे घेण्याकरिता ये-जा करतात. हे सर्व गावे शाळेपासून २ ते ५ किलोमीटर अंतरावर येतात. या गावातून वरूडला ये-जा करणाऱ्या गाड्यांच्या फेऱ्या आहेत परंतु शाळेच्या वेळेवर विद्यार्थ्यांना येण्यास त्या उपयुक्त ठरत नाही.

यात विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होते. शाळा संपल्यानंतर घरी पोहोचण्यास या विद्यार्थ्यांना बराच वेळ होतो. ही बाब लक्षात घेऊन मुख्याध्यापक एस. व्ही.खोडे यांनी आगार व्यवस्थापक आकाश तागडे यांना या सर्व गावच्या सरपंच, उपसरपंच यांच्या माध्यमातून निवेदन दिले. आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांना लेखी निवेदन देऊन या संदर्भात आगार प्रमुखास सूचना करण्यासाठी विनंती करण्यात आली.

तेव्हा आमदारांच्या सूचनेप्रमाणे आगार व्यवस्थापकांनी आलोडा बेलोरा आणि परसोडा या तिन्ही गावाकरिता स्वतंत्र फेरी सुरु केली.

काल सायंकाळी लोणी येथे ही बस आली असता सर्व विद्यार्थ्यांना या गाडीमध्ये बसविण्यात आले तेव्हा सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुललेले दिसत होते. एकच आनंद दिसत होता की, आज आपण अगदी वेळेवर घरी पोहोचु. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये वासुदेव पोहरकर, प्रकाश मालपे यांच्या हस्ते बसचालक संतोष गवई, वाहक देवेंद्र गजभिये यांचे नारळ, पान पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या सुरु केलेल्या बससेवेबद्दल आमदार उमेश यावलकर, आगार प्रमुख आकाश तागडे, आगार निरीक्षक राजन वाडबुध्दे, दर्शन गावंडे महाराज, वासुदेव पोहरकर, सर्व गावांचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयाचे सर्व शिक्षकयांचे विद्यार्थी आणि पालकांनी आभार मानले.

# बालगृहातील तीन मुलींच्या कुटुंबाचा शोध

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – येथील शासकीय मुलींच्या बालगृहात दाखल झालेल्या मोना,अनामिका आणि सोनी अकील यादव यांना भेटण्याकरिता आजपर्यंत त्यांचे आई-वडिल व नातेवाईक आलेले नाहीत. मुलींचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने त्यांच्या कुटुंबियांचा शोध सुरु असल्याचे बालगृहाच्या अधिक्षकांनी कळिवले आहे.

नांदगाव पेठ पोलीस स्टेशन अंतर्गत १२ ऑगस्ट २०२६ रोजी मोना ही बालिका, भातकुली पोलीस स्टेशन मार्फत ४ सप्टेंबर २०२५ रोजी अनामिका ही बालिका तर अमरावती रेल्वे पोलिसांमार्फत १४ ऑगस्ट २०२६ रोजी सोनी अकील यादव ही बालिका बाल कल्याण समितीच्या आदेशाने शासकीय मुलींच्या बालगृहात दाखल झाल्या आहेत.

मोना ही बालिका दामिनी पथकाला नांदगाव पेठ जवळील मंदिरात आढळून आली. तिचे वय साधारणत: १६ ते १८ वर्षा दरम्यान असून उंची १४४ सेमी तर वजन ३६ किलो, वर्ण सावळा आहे.

अनामिकाही ही माईल्ड मतिमंद असून तिचे वय १२ ते १६ वर्षा दरम्यान आहे. तिचे वजन १५ किलो,उंची १३५ सेमी आणि वर्ण सावळा आहे. ती फक्त तुरळक हिंदी शद्ब बोलते. सद्य: स्थितीत तिला मोझरी येथील मतीमंदाच्या शाळेत पाठविण्यात आले आहे.बालिकेच्या कुटुंबियांचा शोध घेण्याबाबत भातकुली पोलीस स्टेशनला कळिवण्यात आले आहे.

सोनी अकील यादव ही बालिका जबलपूर रेल्वे मध्ये एकटी भटकतांना आढळल्याने तीला अमरावती रेल्वे पोलिसांमार्फत बालगृहात दाखल करण्यात आले. सोनीचे वडील रेल्वेतून पडून त्यांचा मृत्यू झाल्याचे तर आई सोडून गेल्याचे ती सांगते. गावाचे नाव उत्तर प्रदेशातील सिद्धार्थनगर येथील कुडीयागाव वस्का बाजार तर जवळच्या पोलीस स्टेशनचे नाव इटावा सांगते.

बालीकेचे २९ सप्टेंबर २०२४ रोजी मरीयमपूर येथे स्थानांतरण करण्यात आले. १५ सप्टेंबर २०२६ रोजी ती होली क्रॉस बाल शिक्षण केंद्र अमरावती येथून न सांगता निघून गेली. ती नागपूर येथे पो-लीसांना आढळ्यानंतर शासकीय मुलींच्या बालगृहात दाखल करण्यात आले.

# राज ठाकरेंनी सांगितलं, मुख्यमंत्री सकारात्मक, लवकरच चांगली बातमी : रोहित पवारांची पहिली प्रतिक्रिया

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***नवी दिल्ली*** – मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा केली. यामध्ये देवेंद्र फडणवीस खूप सकारात्मक आहेत आणि येत्या काही दिवसांत एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यां संदर्भात एक चांगली बातमी येईल अशी अपेक्षा आहे, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली. राज ठाकरेंच्या या माहितीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. रोहित पवार काय म्हणाले? आदरणीय राज ठाकरे , अध्यक्षांचा राजीनामा आणि आयोगाचे संपूर्ण शुद्धीकरण हीच विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी आणि जनभावना असून हजारो विद्यार्थी त्यासाठी गेल्या ९ दिवसापासून आंदोलन करत आहेत. शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांशी केलेल्या शेवटच्या चर्चेत ७० हजार पदांच्या भरतीसह बाकी इतर मागण्या विद्यार्थ्यांच्यावतीने मान्य करवून घेतल्याच आहेत, असं रोहित पवार म्हणाले. तसेच मुख्यमंत्र्यांसोबत आपल्या झालेल्या चर्चेत ते सकारात्मक असतील आणि यातूनच मुख्यमंत्री 'विवेक' दाखवत अध्यक्षांचा राजीनामा आणि आयोगाच्या संपूर्ण शुद्धीकरणासाठी निर्णय घेणार असतील तर या चांगल्या बातमीची हजारो विद्यार्थी आतुरतेने वाट बघत आहेत. चांगली बातमी येईल, ही अपेक्षा, असंही रोहित पवारांनी सांगितलं.

# 30 ऑक्टोबरला भारत पाकिस्तान हायव्होल्टेज सामना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




***नवी दिल्ली*** – हाँगकाँग सिक्सेस २०२६ स्पर्धेचं बिगुल वाजलं आहे. या स्पर्धेला ३१ ऑक्टोबरपासून सुरुवात होणआर आहे. ही स्पर्धा तीन दिवसांची असून ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान खेळवली जाईल. हा क्रिकेटचा सर्वात वेगवान प्रकार आहे. यात दोन्ही बाजूंनी प्रत्येकी सहा खेळाडू असतात आणि सामना सहा षटकांचा असतो. या वेगवान स्पर्धेची सुरुवात १९९२ मध्ये झाली. पहिलीवहिली स्पर्धा पाकिस्तानने जिंकली होती. आंतरराष्ट्रीय टी२० क्रिकेटचा उदय होण्यापूर्वीच्या काळात ही स्पर्धा क्रिकेट जगतात आकर्षणाचे केंद्र ठरली होती. या स्पर्धेच्या इतिहासात पाकिस्तान हा सर्वात यशस्वी संघ आहे. पाकिस्तानने आतापर्यंत सर्वाधिक सहा वेळा (१९९२, १९९७, २००१, २००२, २०११ आणि २०२५) हे जेतेपद मिळवले आहे. त्याखालोखाल इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांनी प्रत्येकी पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. भारताने २०२६ मध्ये श्रीलंकेला हरवून एकदा हाँगकाँग सिक्ससचे विजेतेपद पटकावले आहे.

## दूध उत्पादन २५ ते ३० टक्क्यांनी घटले : शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***छत्रपती संभाजीनगर*** – पावसाने पाठ फिरविल्याने मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळाचे चटके तीव्र झाले आहेत. शेतातील पिके करपल्यानंतर आता त्याची झळ थेट गोठ्यापर्यंत पोहोचली आहे. चारा आणि पशुखाद्याच्या वाढलेल्या किमती, पाण्याची टंचाई तसेच वाढत्या उष्णतेचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होत असून, अनेक भागांत दूध उत्पादनात २५ ते ३० टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे दूध उत्पादक सांगत आहेत. दूध व्यवसायातून दररोज मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटुंबाचा खर्च भागविणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता जनावरांचा सांभाळ करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. एकीकडे दूध उत्पादन घटले आहे, तर दुसरीकडे चारा, ढेप आणि पशुखाद्याच्या किमती वाढल्या आहेत.

# 'महा-उपलब्धी' ॲपमुळे निवृत्तीवेतन धारकांसाठी सेवा अधिक सुलभ व पारदर्शक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**अमरावती** – वित्त विभाग आणि संचालक, लेखा व कोषागारे यांच्या निर्देशानुसार अमरावती जिल्हा कोषागार कार्यालयात मंगळवारी, दि. ६ ऑक्टोबर रोजी 'महा-उपलब्धी' मोबाईल ॲपबाबत निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी विशेष कार्यशाळा उत्साहात पार पडली.

जिल्हा कोषागार कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत 'महा-उपलब्धी' ॲपच्या माध्यमातून निवृत्तीवेतनधारकांना उपलब्ध होणाऱ्या विविध सुविधांची माहिती देण्यात आली. कार्यशाळेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग यांचे प्रतिनिधी तसेच सहसंचालक प्रिया तेलकुंटे, सहाय्यक संचालक पंकज शिरमाते, कोषागार अधिकारी अमोल इखे आणि सहाय्यक संचालक प्रल्हाद तुमाने उपस्थित होते.

यावेळी जीवन प्रमाणपत्र 'महा-उपलब्धी' ॲपद्वारे सादर करण्याबाबत कोषागार अधिकारी अमोल इखे यांनी मार्गदर्शन केले. प्रिया तेलकुंटे यांनी निवृत्तीवेतनधारकांना ॲपचा वापर करण्याचे आवाहन केले. कार्यशाळेत अंशराशीकरणाबाबत आवश्यक माहिती, वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर मिळणारे निवृत्तीवेतनातील लाभ, तसेच हयातीचा दाखला ऑनलाइन व सुलभ पद्धतीने सादर करण्याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

वरिष्ठ लेखापाल राम जाधव यांनी प्रास्ताविक केले. कनिष्ठ लेखापाल नयना सोलव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत चोबिता येथे 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**चिखलदरा** – जिल्हा परिषद कृषि विभागामार्फत सेवा संकल्प अभियानांतर्गत चिखलदरा तालुक्यातील चोबिता गावाला प्रत्यक्ष भेट देऊन बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत नवीन विहिरीचा लाभ मिळालेल्या बुडी रावजी कास्देकर या लाभार्थ्याच्या घरी 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्यात आला.

जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, कृषि विकास अधिकारी मल्ला तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. विहिरीचा लाभ मिळाल्यामुळे संबंधित लाभार्थ्याच्या शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होऊन कृषी उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे.

सदर भेटीदरम्यान निलेश राठोड, जिल्हा कृषी अधिकारी, (वि.घ.यो.) तसेच अश्विन राठोड, कृषी अधिकारी, पंचायत समिती चिखलदरा हे उपस्थित होते.

यावेळी लाभार्थी कुटुंबाशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व अपेक्षा जाणून घेण्यात आल्या.बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत मोटर, पाईप, पंपसंच, परसबाग इत्यादी घटकांचा लाभ घेणेबाबत आवाहन करण्यात आले.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कृषिविषयक योजना,सेवा व विकासकामे ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जमातीतील आदीवासी शेतकरी बांधवांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावे असे आवाहन निलेश राठोड जिल्हा कृषी अधिकारी (वि.घ.यो.) यांनी केले आहे.

आदिवासी बांधवांचे स्थलांतर कमी करुन योजनेच्या माध्यमातून त्यांच्या शेतीमध्ये ख-या अर्थाने क्रांती घडून येणार आहे.त्यासाठी जास्तीत जास्त आदीवासी शेतकरी बांधवांनी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा लाभ घ्यावा.

# एसटीच्या जमिनींतून उत्पन्नाचा 'महामार्ग', ९८ वर्षांच्या भाडेपट्ट्याला मंजुरी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***मुंबई*** – आर्थिक उत्पन्नाचे स्रोत वाढवून एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यावसायिक विकास करण्याच्या निर्णयाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे.

सार्वजनिक - खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर या जमिनींचा विकास करता येणार असून, त्यासाठी ४९ अधिक ४९ वर्षे असा एकूण ९८ वर्षांपर्यंतचा भाडेपट्टा करता येईल. राज्यभरात एसटीच्या ताब्यात असलेल्या ८५० ठिकाणांवरील ३ हजार ५०० एकरांहून अधिक जमिनींच्या नियोजनबद्ध विकासातून महामंडळाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रक्रियेसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. महामंडळाच्या स्वमालकीच्या जमिनींसह भूसंपादनातून मिळालेल्या, पूर्वीच्या रोड ट्रान्सपोर्ट विभागाकडून हस्तांतरित झालेल्या, भाडेकरारावरील तसेच बक्षीसपत्राद्वारे प्राप्त झालेल्या जमिनींवरही पीपीपी तत्त्वानुसार विकास प्रकल्प राबविता येणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र निविदा काढणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# श्री सप्तशृंगीगडावर खासगी वाहनांना प्रवेशबंदी !

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***नाशिक*** – नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेनिमित्त श्री सप्तशृंगीगडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने वाहतुकीसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नांदुरी ते सप्तशृंगीगड या घाटमार्गावर ठरावीक कालावधीत खासगी वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले आहेत. भाविकांची सुरक्षितता, वाहतूक कोंडी टाळणे आणि घाटमार्गावरील अपघातांचा धोका कमी करणे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. या कालावधीत एसटी बस आणि अत्यावश्यक वाहनांना नियमानुसार प्रवेश दिला जाणार आहे. सप्तशृंगीगडावर कधी असणार खासगी वाहनांना बंदी? नाशिकचे अपर जिल्हा दंडाधिकारी रोहितकुमार राजपूत यांनी यासंदर्भात आदेश जारी केला आहे. त्यानुसार, पुढील कालावधीत नांदुरी ते सप्तशृंगीगड घाटमार्गावर खासगी वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध लागू राहणार आहेत.

# राष्ट्रीय पोषण माह २०२६ निमित्त पोषण जनजागृती कार्यक्रम उत्साहात



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

***अमरावती*** – राष्ट्रीय पोषण माह २०२६ निमित्त विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे पोषण जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

डॉ.अमोल नारोटे, वैद्यकीय अधीक्षक तसेच माननीय डॉ.मंगेश मेंढे, विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास डॉ.मोहोड, डॉ.जयश्री, डॉ.कुदमेथे, कुलकर्णी, गाढे, सावळे, विखे, चंदा खोडके, सुफारम आणि चव्हाण, समाजसेवा अधीक्षक शितल बोंडे, ऋषिकेश धस यांची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी संतुलित आहार, माता व बालकांचे पोषण, किशोरवयीन मुलींचे पोषण, रक्तक्षय प्रतिबंध, स्थानिक व हंगामी पौष्टिक पदार्थ तसेच निरोगी जीवनशैली याबाबत जनजागृती करण्यात आली. विविध पोषणविषयक मॉडेल, फ्लॅश कार्ड, पोस्टर व माहितीपर प्रदर्शन यामधून उपस्थितांना पोषणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

सदर कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी आहारतज्ज्ञ कविता देशमुख यांनी सांभाळली. कार्यक्रमास रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी, रुग्ण तसेच नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या, ट्यूटर व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेस कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. उपस्थितांनी पोषण जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले.

# मोर्शीत अवैध बोअरवेल करणाऱ्या दोन वाहनांवर जप्तीची कारवाई

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर महसूल विभागाची धडक मोहीम : पाळा येथे कारवाई

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मोर्शी** – यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने भूजलसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी जिल्ह्यात नवीन विहिरी व बोअरवेल खणण्यास बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशाचे उल्लंघन करून अवैधपणे बोअरवेल खणण्याचे काम सुरू असल्याचे आढळून आल्याने मोर्शी महसूल विभागाने धडक कारवाई केली. तालुक्यातील पाळा येथे अवैध बोअरवेलचे काम करणारी दोन मशीन वाहने जप्त करण्यात आली असून, या कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

गुरुवार, दि.८ ऑक्टोबर रोजी मोर्शी तालुक्यातील पाळा येथील पकडे यांच्या शेतात अवैधपणे बोअरवेल खणण्याचे काम सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली. त्यानुसार उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने घटनास्थळी धाव घेत कारवाई केली.

या कारवाईदरम्यान कल्याणसिंग राजपूत (रा.उदयपूर, राजस्थान) यांच्या मालकीचे जीजे ०३ सीएल ८१०० आणि रोहन सेजवर (रा.राजकोट, गुजरात) यांच्या मालकीचे जीजे ०३ सीएल ८१०९ क्रमांकाचे बोअरवेल मशीन वाहने जप्त करण्यात आली. दोन्ही वाहनांचा पंचनामा व जप्तीनामा तयार करून ती मोर्शी पो-लीस ठाण्यात जमा करण्यात आली आहेत.

जिल्ह्यातील पहिलीच धडक कारवाई यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने भूजलसाठा जपण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत. नवीन विहिरी व बोअरवेल खणण्यावर बंदी असतानाही नियमांचे उल्लंघन होत असल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. जिल्ह्यातील ही अशा प्रकारची पहिलीच धडक कारवाई असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

महसूल पथकाची महत्त्वपूर्ण भूमिका उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार गजानन दाते, सहायक महसूल अधिकारी सुधीर शिरभाते, वाहनचालक प्रवीण देवतळे, महसूल सेवक दुर्गेश चारे, पाळा साझाचे ग्राम महसूल अधिकारी रोशन जैस्वाल, ग्राम महसूल अधिकारी जयंत मालपे, रोशन पकडे आणि गोपाल राठोड यांनी ही कारवाई पार पाडली.

पावसाचे घटते प्रमाण आणि भूजलपातळीवरील संभाव्य परिणाम लक्षात घेता, पाण्याचा अपव्यय रोखणे व उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे बंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महसूल विभागाकडून पुढील काळातही लक्ष ठेवले जाण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.




# आणखी एका कंत्राटदाराची आत्महत्या : देयकाची रक्कम न मिळाल्याने उचलले टोकाचे पाऊल

**आतापर्यंत ९ कंत्राटदारांनी केली आत्महत्या**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – आदिवासी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभागाकडील शासकीय देयके न मिळाल्याने सुनील वागद्रे (४३) या शासकीय कंत्राटदाराने शेतात गळफास लावून जीवन संपवले. राज्यात आतापर्यंत ९



कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या असून राज्य सरकारला कधी जाग येणार, असा संतप्त सवाल कंत्राटदार महासंघाने केला आहे.

महाराष्ट्रातील मौजे जरुड तालुका वरुड जिल्हा अमरावती येथील उद्योमुख शासकीय मान्यताप्राप्त कंत्राटदार सुनीलभाऊ वागद्रे (४३) यांनी देयकाचे अडीच कोटी रुपये न मिळाल्याने टोकाचे पाऊल उचलत जीवन संपवले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगी व लहान मुलगा असा परिवार आहे. गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने संबंधित विभागाकडील देयके मिळत नाहीत.

मुंबईत सतत जाऊन देयके मिळावे म्हणून त्यांनी पाठपुरावा केला. संबंधित मंत्री, अधिकारी यांच्या भेटीगाठी घेतल्या, चपला झिजवल्या. मात्र राज्य सरकारकडून कुठलाच प्रतिसाद मिळत नव्हता. यामुळे आर्थिक परिस्थिती बिकट झाली, कुटुंब कसे जिवंत ठेवायचे, आपली देयके मिळणारच नाहीत, अशी भूमिका त्यांची झाली आणि यामुळे त्यांना प्रचंड नैराश्य आले. या नैराश्यपोटी त्यांनी आपले जिवन संपविले आहे.

याबाबत शनिवारी १० ऑक्टोबर रोजी या तिन्ही संघटनेच्या राज्यातील सर्वच पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक दुपारी ४ वा होणार आहे. या बैठकीत पुढील आंदोलन बाबत निर्णय घेण्यात अशी माहिती अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

# क्रिकेटसाठी कल्याणहून रत्नागिरीला पोहोचले, पण सामना संपल्यानंतर मृत्यूने गाठले : डोहात बुडून दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***रत्नागिरी*** – तालुक्यातील कोळंबे येथे क्रिकेट खेळण्यासाठी कल्याणहून आलेल्या दोन अल्पवयीन मुलांचा डोहात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शुभम यादव आणि सौरभ झा अशी मृत मुलांची नावे असून, दोघेही १६ वर्षांखालील असल्याची माहिती मिळाली आहे.

कल्याण येथून एका क्रिकेट ॲकॅडमीचे सुमारे २० ते २२ मुले आणि दोन शिक्षक कोळंबे येथे सुरू असलेल्या १६ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेसाठी आले होते. गुरूवारी दुपारी त्यांचा सामना



संपल्यानंतर काही मुले मैदानालगत असलेल्या जंगलातील पाण्याच्या डोहात पोहण्यासाठी गेली. यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने शुभम यादव आणि सौरभ झा हे दोघे खोल पाण्यात बुडाले. आरडाओरडा ऐकून स्थानिक नागरिक जमा झाले, पण त्यांनी मुलांना बाहेर काढेपर्यंत खूप उशीर झाला होता. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले. दोघांना पाण्याबाहेर काढण्यात आले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर जखमा होत्या. डोहात उडी मारताना दगडावर आदळल्यामळे त्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. डोहाजवळ पोहण्यासाठी जाऊ नये, याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी सूचना फलक लावले आहेत. तसेच या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दगड असल्याने नागरिकही या परिसरात जाणे टाळतात. मात्र, सूचनांकडे दुर्लक्ष करून मुले डोहात उतरल्याचे सांगण्यात येत आहे.

# भगत ताराचंदसह चौघांचे परवाने रद्द

## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – मुंबई आणि कोकण विभागातील अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) करण्यात आलेल्या तपासणीत गंभीर स्वरूपाचे स्वच्छता आणि अन्नसुरक्षेचे उल्लंघन आढळून आल्यानंतर, लोकप्रिय रेस्टॉरंट साखळी 'भगत ताराचंद' आणि कॉफी साखळी 'बॅरिस्टा'सह एकूण सहा रेस्टॉरंटचे परवाने/नोंदणी रद्द करण्यात आले आहेत. पनवेल येथील 'चावला एंटरप्रायजेस' (भगत ताराचंद) मध्ये एफडीएच्या अधिकाऱ्यांना




स्वयंपाक घरामध्ये, साठवणूक कक्षामध्ये आणि संपूर्ण परिसरात मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आढळली. त्याच वातावरणात अन्नपदार्थांची साठवणूक व विक्री केली जात होती. कर्मचाऱ्यांकडे वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्रे नव्हती तसेच एप्रन आणि हँडग्लोज यांसारख्या मूलभूत स्वच्छताविषयक वस्तूही नव्हत्या.

# सोमेश्वर साखर कारखान्याच्या निवडणुकीत बंडखोरी केलेल्या पुरुषोत्तम जगतापांची पक्षातून हाकालपट्टी



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**बारामती** – सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसमधून बंडखोरी केलेले पुरुषोत्तम जगताप यांना राष्ट्रवादीतून निलंबित करण्यात आलं आहे. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत बंडखोरी करीत भाजपच्या सहाय्याने पुरुषोत्तम जगताप यांनी पॅनल उभा केल्यानं त्यांच्यावरती निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संदीप बांदल ही कारवाई केली आहे. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून, विद्यमान चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी स्वतंत्र पॅनल उभे केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात मोठी हालचाल सुरू झाली आहे.

# कर अधिकाऱ्यांचे अटकेचे अधिकार अखेर रद्द; जीएसटी परिषदेची करदात्यांसाठी जलद परताव्यालाही मंजुरी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नवी मुंबई** – उच्च अधिकारप्राप्त जीएसटी परिषदेने गुरुवारी कर अधिकाऱ्यांचे अटकेचे अधिकार काढून घेण्याच्या आणि खटला चालवण्याची (प्रॉसिक्युशन) मर्यादा पाच पटीने वाढवून ५ कोटी रुपये करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

तसेच, करदात्यांसाठी जलद आणि बहुतांश स्वयंचलित परताव्याची व्यवस्थादेखील सुरू करण्यात आली आहे. जीएसटी परिषदेच्या ५७ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची घोषणा करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, परिषदेने सामान्य दंड




२५,००० रुपयांवरून कमी करून १०,००० रुपये करण्याचा निर्णयही घेतला आहे.

जीएसटी परिषदेने मंजूर केलेले हे बदल १ एप्रिल २०२७ पासून लागू केले जातील. परिषदेने एका प्रस्तावाला मंजुरी दिली आहे, ज्यानुसार उशीर करणारा, चूक करणारा किंवा कर भरण्यात मागे राहिलेला करदाता केवळ वसुली, व्याज आणि प्रमाणात दंड यांस सामोरं जाईल, त्यापेक्षा जास्त काही नाही.

इन्व्हर्टेड रेट स्ट्रक्चर अंतर्गत येणाऱ्या परताव्यांची व्याप्ती इनपूट सेवांपर्यंत वाढवणे ही आणखी एक महत्त्वाची शिफारस होती. हा बदल १ नोव्हेंबर २०२६ रोजी किंवा त्यानंतर घेतलेल्या क्रेडिटसाठी उपलब्ध असेल, असे सीतारामन यांनी सांगितले. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, सरकार एकाच राज्य किंवा बहुविध राज्यांमध्ये नोंदणीकृत असलेल्या केंद्रीय वस्तू आणि सेवा कर करदात्यांसाठी 'फेसलेस कर मूल्यांकन' सुरू करण्याचा विचार करत आहे.

# भाजप खासदाराच्या गाडीनं भंडाऱ्यात दोघांना चिरडलं

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**भंडारा** – मध्यप्रदेशातील बालाघाटचे भाजप खासदार भारती पारधी यांच्या वाहनानं तुमसर-रामटेक या राष्ट्रीय महामार्गावर दुचाकीस्वार दोघांना चिरडल्याची घटना घडली आहे. मध्यप्रदेशातील बालाघाटचे भाजप खासदार भारती पारधी यांच्या वाहनानं तुमसर-रामटेक या राष्ट्रीय महामार्गावर दुचाकीस्वार दोघांना चिरडल्याची घटना घडली आहे. या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघेही गंभीर जखमी झाले. परिणामी त्यांना तातडीनं भंडारा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सुरजित सिंग आणि तसमिरा मेहरा असं या अपघातात गंभीर जखमींचं नावं आहे. मिळालेल्या माहितीनुसार,

***भंडाऱ्यातील तुमसर - रामटेक मार्गावरील घटना, गुन्हा दाखल करत अपघातग्रस्त वाहन जप्त**



दोन्ही जखमी हे पंजाब मधील असून भंडारा जिल्ह्यात भात कापणीसाठी हार्वेस्टरवर मजूर म्हणून आलेले आहेत. बालाघाटच्या खासदार भारती पारधी या स्वतः या अपघातग्रस्त वाहनातून बालाघाट येथून नागपूरच्या दिशेनं प्रवास करीत असताना हा अपघात झाल्याची माहिती आहे. भंडाऱ्याच्या तुमसर तालुक्यातील उसर्रा इथं हा अपघात घडला आहे.

दरम्यान, याप्रकरणी आंधळगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करत अपघातग्रस्त वाहन ताब्यात घेतल असून पुढील घटनेचा तपास पोलीस करत आहे. मात्र या घटनेनं काहीकाळ परिसरात वाहतूक अडथळा निर्माण झाला होता. व बघ्यांनी एकच गर्दी केल्याने परिसरातही खळबळ उडाली होती.




